# दि लक्ष्मी को-ऑप. बँक लि., सोलापूर

मुख्य कार्यालय : ३१९, दक्षिण कसबा, सोलापूर-४१३००७.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

बँकेची ११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८/०२/२०२१ रोजी दुपारी ठीक ४.०० वाजता बँकेचे प्रधान कार्यालय, ३१९, दक्षिण कसबा, सोलापूर येथे ऑनलाईन पद्धतीने खालील विषयांचा विचार करण्यासाठी भरणार आहे. सदरची सभा ही कोव्हीड- १९ या महामारीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या नोटिफिकेशननुसार ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात येणार असल्याने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही. त्यामुळे सभासदांनी ZOOM app च्या माध्यमातून उपस्थिती नोंदवावी ही विनंती.

## सभेपुढील विषय

१) दि. २९.०९.२०१९ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग्ज वाचून कायम करणे.

२) सन २०१९-२० सालाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक, नफा-तोटा पत्रक व नफ्याची वाटणी मंजूर करणे.

३) सन २०१९-२० सालाचा वैधानिक लेखापरिक्षकांचा लेखापरिक्षण अहवाल माहितीसाठी व सन २०१८-१९ सालाचे वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोष-दुरूस्ती माहितीसाठी.

४) सन २०१९ -२० सालांत अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

५) सन २०२०-२१ सालासाठी बँकेचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी.

६) सन २०२०-२१ या सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे.

७) सन २०२०-२१ या सालासाठी अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक करणे.

८) सन २०२०-२१ या सालाकरिता बाहेरून उभे करावयाच्या भांडवलाची मर्यादा ठरविणेबाबत.

९) बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबत माहितीस्तव.

१०) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या पोट-नियम दुरूस्तीस मान्यता देणे.

११) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.

१२) मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने येणारे आयत्या वेळचे विषय.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून,
संजय वसंत एकबोटे
**सरव्यवस्थापक**

सोलापूर
तारीख : २९.०१.२०२१

**टीप :** १) सदरची सभा ही ZOOM app च्या माध्यमातून घेण्यात येत असल्याने त्यास वेगळ्या गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही. २) ज्या सभासदांना सदरचे ताळेबंद पत्रकासंबंधी काही माहितीवजा प्रश्न वार्षिक सभेत विचारावयाचे असतील तर त्यांनी त्यांचे लेखी प्रश्न बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे दि. २३/०२/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पाठवावेत. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही. ३) ZOOM app चा मिटींग आय. डी. 9278366000 असा असून त्याचा पासवर्ड सभासदांनी बँकेच्या नजीकच्या शाखेत आपले सभासदत्वाची ओळख पटवून घेणेचा आहे.